R.No.MAHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ११५ शनिवार दि.१५ नोव्हेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# विश्वधर्मी रामेश्वर (रूई) येथे 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना'चे लोकार्पण विश्वनाथाच्या रुपाने 'मानवतेची ज्योत' प्रज्वलीत





लातूर :- जगाला एका सूत्रात ठेवायचे असेल तर मानवता आवश्यक आहे. मानवते शिवाय कोणताही देश जीवंत राहू शकत नाही. देशाच्या उन्नतीसाठी मानवता आणि व्यक्तीचे शुद्ध आचरण अत्यंत महत्वाचे आहे. आज रामेश्वर (रूई) येथे विश्वनाथाच्या रुपाने मानवतेची ज्योत पेटविण्यात आली आहे. जी संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी आहे. असे विचार भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांचे सुपूत्र व माजी खासदार सुनील शास्त्री यांनी व्यक्त केले.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर (रूई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनाचे' लोकर्पण लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रूई) या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुनील शास्त्री बोलत होते. सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानवतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या, मानवी इतिहासातील काही उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्वांच्या चैतन्यदायी प्रतिकांची या ठिकाणी प्रतिष्ठापना, पूजन आणि कोनशिलेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मानवतेची ज्योत प्रज्वलत ठेवणारे डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचा विशेष सत्कार जपान येथून आलेले इसो कोईतोमियो व पेजावर मठाच्या वतीने करण्यात आला.

यावेळी अखील भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस व रामविलास वेदांती हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी संत वृत्तीचे शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर होते. तसेच या वास्तूचे संरचना, नियोजक व निर्मितीकार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे उपस्थित होते. आ रमेशआप्पा कराड, माईर्स एमआयटीचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड, अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड, माईर्स एमआयटीचे विश्वस्त हभप तुळशीराम दा. कराड, प्रगतिशील शेतकरी हभप काशीराम दा. कराड, रामेश्वर (रूई) चे सरपंच सचिन कराड व राजेश कराड उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुनील शास्त्री म्हणाले की, भारतरत्न लाल बहाद्दू शास्त्री यांनी दिलेल्या जय जवान, जय किसन या संदेशाच्या पुढे वर्तमानकाळात जय इंसान जोडणे गरजेचे आहे. लाल बहाद्दूर शास्त्री यांनी मानवतेचे स्वप्न मला दाखविले होते परंतू प्रत्यक्षात डॉ. कराड यांनी ते साकार केले आहे. तर डॉ. विजय भटकर म्हणाले, मानवतेचा संदेश मांडणारे डॉ. विश्वनाथ कराड हे विश्वासमोर एक आदर्श आहेत. यातूनच समाजात एक उच्च संस्कृती उदयास येईल. या विचारातूनच एक आदर्श समाज निर्माण होईल. तसेच समरसतेचा संदेश खेड्या खेड्यातून जगापुढे जाणे गरजेचे आहे.

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, संपूर्ण जगाला विश्वशांती आणि विश्व कल्याणाचा संदेश विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनातून जाईल. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत देशाचे खरे रुप रामेश्वर येथे दिसून येते आहे. हा मानवता भवनच संपूर्ण जगाची दिशा दर्शविणारा आहे. येथून भारतीय चिंतन, परंपरेचा संदेश विश्वात पोहचणार असून सर्वांनी त्याचे अनुकरण करावे. भगवान गौतम बुद्धांचे पंचशील आणि संत ज्ञानेश्वर माऊली यांचे पसायदान हे मानव उध्दारासाठी आहे.

डॉ. राहुल दा. कराड म्हणाले, संस्थेच्या माध्यमातून डॉ. कराड यांनी माइलस्टोन कार्य केले आहे. विश्व शांती हेच या संस्थेचे लक्ष्य असून त्या आधारेच मानवतातीर्थ भवनाची निर्मिती झाली. या भवनातूनच संपूर्ण जगात लोकशाही बळकट करणे, अध्यात्म आणि खिलाडूवृत्ती रूजविण या तीन गोष्टीं साकार होतील. डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, विश्वात सुरू झालेल्या संघर्षाच्या वातावरणात मानव भयभीत झाला आहे. अशा वेळेस मानवधर्मा संदर्भात विचार करतांना एकात्मता, विज्ञान आणि अध्यात्माचा सारांश, संतांचे संतत्व आणि धर्माची पुण्याई या सर्वांचा मेळ म्हणजेच मानवता येथे दिसून येते आहे. सर्व धर्मांचा गाभा हा मानवतेचा आहे. येथूनच सात्विकतेचा आणि अहिंसेचा विचार विश्वाला तारणारा आहे. या वास्तूत मानवधर्माचे तीर्थ क्षेत्र दिसून येत आहे. येथे धार्मिकतेची देवाण घेवाण घडतांना दिसत आहे. डॉ. राम विलास वेदांती म्हणाले, विश्वाला शांती आणि मानवतेचे रक्षण करण्यासाठी डॉ कराड यांचे मानवतेचे विचार महत्वाचे आहे. सामाजिक सदभावसाठी राष्ट्रीय एकतेचे सर्वात मोठे कार्य केले आहे. डॉ. कराड यांनी बनविलेले विश्वधर्मी मानवता भवनात सर्व जाती, धर्मांचे लोक विराजमान आहेत. रामेश्वर येथे सामाजिक एकतेचे दृष्य पहावयास मिळणे हे दुर्लभ क्षण आहेत.

यावेळी फादर फेलिक्स मचाडो, राहुल भन्ते बोधी, एडीसन सामराज, डॉ. मेहर मास्टर मूस, इझिकेल मळेकर, सरदार सुरजीत सिंह खालसा, डॉ. फिरोज बख्त अहमद, डॉ. लेसन आझादी, योगी अमरनाथ, मौलाना अन्सारी चतुर्वेदी, महंत रामदास, बि.के. बिन्नी सरीन, कमलाताई गवई, पुष्पा बोंडे, मायकेल गनेल, इंद्रजीत भालेराव या सर्वांनी डॉ. कराड यांच्या विश्वशांती कार्याला हातभार लावण्याचे आश्वासन दिले. तसेच त्यांच्या कार्याला पाहुन भारत सरकार कडून भारतरत्न देण्याची मागणी केली. ते सर्व गुण संपन्न आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे उत्तुंग कार्य पाहता त्यांना नोबल पुरस्काराने गौरवान्वित करण्यात यावे. तसेच माजी केंद्रीय मंत्री डॉ. करण सिंग, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आणि अमेरिकेतून डॉ. अशोक जोशी यांनी व्हिडीओच्या माध्यमातून संदेश दिला.

यावेळी लेखक लक्ष्मण घुगे लिखित विश्वशांतीची महागाथा या कादंबरीचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते झाले. तसेच वास्तू रचनाकार विभीषण शेप यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. मिलिंद पात्रे यांनी ओमकार ध्यान साधना केली. डॉ. मंगेश तु. कराड यांनी स्वागतपर भाषण केले. डॉ. गौतम बापट व प्रा.अतुल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले आणि डॉ. सुचित्रा कराड-नागरे यांनी आभार मानले.



बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपा प्रणित आघाडीने घवघवीत यश प्राप्त केल्याबद्दल लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने येथील महात्मा गांधी चौकात आनंद उत्सव साजरा करण्यात आला यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर शहर निवडणूक प्रमुख अर्चना पाटील चाकूरकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# राज्यात साथीच्या आजारांचा उद्रेक

मुंबई : राज्यात अनियमित पाऊस, साचलेले पाणी आणि बदलते हवामान या कारणांमुळे डासांची उत्पत्ती वाढली असून, मलेरिया, डेंग्यूचा, चिकनगुनियाचा प्रादुर्भाव वाढत आहे. राज्यात मुंबई मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनियाची हॉटस्पॉट ठरली आहे.

यंदा मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली होती. हा पाऊस नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सुरूच होता. या कालावधीत हवामानात सातत्याने बदल होत असल्याने साथीच्या आजारांनी डोके वर काढले. राज्यात मान्सून परतला असला तरी सध्या साथीच्या आजारांचा प्रकोप सुरूच आहे. आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांत डेंग्यू, मलेरिया, स्वाईन फ्लू, लेप्टोस्पायरोसिस, चिकनगुनिया आणि जलजन्य आजारांचे ३९,७१८ रुग्ण नोंदले गेले असून ३८ जणांचा मृत्यू झाला आहे. मलेरिया व डेंग्यू या डासजन्य रोगांनी ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण केली आहे. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, ७ नोव्हेंबरपर्यंत राज्यात मलेरियाचे २०,१६६ रुग्ण आणि १५ मृत्यू, तर डेंग्यूचे १२,३५१ रुग्ण नोंदवले गेले आहेत. याशिवाय, जलजन्य आजारांमध्ये कॉलरा(१९१), पिवळा ताप(६८७), गॅस्ट्रोएन्टरायटिस(४३), अतिसार(१,२३४) आणि टायफॉईड(२२) रुग्ण आढळले आहेत. बर्ड फ्लूचीही ७३ प्रकरणे नोंदली गेली आहेत.

इतर जिल्ह्यांचीही स्थिती चिंताजनक

गडचिरोली जिल्ह्यात मलेरियाचे ६,०८८ रुग्ण आढळले आहेत. डेंग्यूचे नाशिकमध्ये ५७६ आणि ठाण्यात ४८८ रुग्ण नोंदले गेले. चिकनगुनियाचे पालघरमध्ये ३४३ आणि पुण्यात २३५ रुग्ण आहेत. लेप्टोस्पायरोसिसच्या ८१० रुग्णांपैकी एकाचा मृत्यू झाला आहे. स्क्रब टायफसच्या २८१ प्रकरणांमध्ये ९ जणांचा बळी गेला आहे. आरोग्य विभागाने साथीच्या आजारांवर नियंत्रणासाठी सात सूत्री आराखडा तयार केला आहे. यात जलद सर्वेक्षण, कीटक नियंत्रण, फॉगिंग, कर्मचा-यांच्या प्रशिक्षण मोहिमांचा समावेश आहे. स्वाईन फ्लू, लेप्टोस्पायरोसिस, स्क्रब टायफस, इन्फ्लुएंझा व बर्ड फ्लूवरील नियंत्रणासाठीही स्वतंत्र कृती आराखडे तयार करण्यात आले आहेत. नागपूरसह सर्व जिल्ह्यांत आरोग्य निरीक्षण वाढविण्यात आल्याचे आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर यांनी सांगितले.मुंबईत सर्वाधिक रुग्ण

मुंबईतच जानेवारीपासून मलेरियाचे तब्बल ८,६९७ आणि डेंग्यूचे ५,२४६ रुग्ण नोंदले गेले आहेत.

# काडीवडगाव जिल्हा परिषद शाळेत बालदिन मोठ्या उत्साहात साजरा

**विद्यार्थ्यांच्या ठायी असलेली सर्जनशीलता आणि आत्मविश्वासच उज्वल भवितव्य घडवतणार- मुख्याध्यापक रवींद्र वावळकर**



बीड/प्रतिनिधी वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन मोठ्या उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र वावळकर हे होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. बहिरवाळ सर, श्री. बडे सर, अंगणवाडी सेविका श्रीम. जयश्रीताई बादाडे, श्रीम. ललिता वावळकर, श्रीम. कांचन टिळे, श्रीम. जनाबाई मोहन राऊत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडित नेहरू यांच्या प्रतिमेचे पुष्प अर्पण करण्यात करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्या नंतर शाळेतील निवडक विद्यार्थ्यांनी नेहरूंच्या बाल प्रेमाबद्दल, शिक्षणाचे महत्त्व, स्वच्छता, पर्यावरण, शाळेतील मूल्य शिक्षण, तसेच आजच्या मुलांवर असलेल्या जबाबदाऱ्या या विषयांवर सुंदर, प्रेरणादायी व प्रभावी विचार मांडले. काही निवडक विद्यार्थ्यांच्या प्रभावी व आत्मविश्वासपूर्ण भाषणांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण मांडणीला उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि पालकांनी उत्स्फूर्त दाद दिली. मुलांच्या वक्तृत्व कौशल्याचे सर्वांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या भाषणानंतर शाळेतील श्री बडे सर व श्री बहिरवाळ सर यांनी आपले विचार मांडले. अध्यक्ष मार्गदर्शन करताना शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र वावळकर यांनी पंडीत नेहरूंचे बालप्रेम, शिक्षणाविषयीचे विचार मांडले विद्यार्थ्यांना बालदिनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेची भूमिका यावर मार्गदर्शन करताना श्री रवींद्र वावळकर म्हणाले की, आपल्या शाळेतील या गोड विद्यार्थ्यांच्या ठायी असलेले विचार, सर्जनशीलता आणि आत्मविश्वासच त्यांचे उज्वल भवितव्य घडवतील. त्या कामी पालक आणि शिक्षकांचे मोलाचे सहकार्य कायम राहणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंजली हातागळे व कु. रुंजी बादाडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षकवर्ग, कर्मचारी, तसेच ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

# राहुल गांधी हतबल, काँग्रेसला जनतेने बिहारमध्ये लाथाडलं; चंद्रशेखर बावनकुळेंची प्रतिक्रिया



नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील जेडीयू हा पक्ष भाजप आणि इतर सर्व पक्षांना मागे टाकत बिहारमध्ये सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येत आहे. एनडीएने महागठबंधनवर आघाडी मिळवली आहे. त्यासोबतच कलांमध्ये तेजस्वी यादव यांची आरजेडी तिसऱ्या नंबरवर फेकल्याचे दिसून येते. यावर भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी भाष्य करत काँग्रेसवर टीका केली आहे. काय म्हणाले चंद्रशेखर बावनकुळे? बिहारच्या जनतेने आम्हाला बहुमत दिलं आहे, कारण आम्ही विकासाचं राजकारण करत आहोत. काँग्रेस हा भविष्यात सर्वात छोटा पक्ष होणार आहे. मतदार याद्यांचे घोळ, ईव्हीएमचे घोळ हे दाखवून खोटं नरेटिव्ह परसवण्याचा प्रयत्न राहुल गांधींनी केला. मात्र नितीश कुमार आणि मोदींनी विकसित भारताचा मुद्दा मांडला. तर राहुल गांधींनी विकासावर काहीही चर्चा केली नाही त्यामुळे जनतेने त्यांना लाथाडलं आहे, असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. पुढे ते म्हणाले, पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी केलेल्या विकास कामावर मतदारांनी शिक्कामोर्तब केला आहे. एवढं मोठं बहुमत इतिहासात कधीच मिळालेल नाही, तेवढं मोठं बहुमत बिहारमध्ये मिळत आहे. संपूर्ण देशावरच बिहारच्या निकालाचे परिणाम होईल. यावेळी बावनकुळे यांनी बिहारच्या जनतेचे देखील आभार मानले आहेत. काँग्रेसला जनतेने नाकारले, काँग्रेस सर्वात छोटा पक्ष काँग्रेसवर टीका करत बावनकुळे यांनी म्हंटले की, काँग्रेस रोजच संपत आहे, राहुल गांधी हतबल झाले आहेत. फक्त मतदार यादीचे चुकीचे मुद्दे समोर करून वेळकाढूपणा करत आहे. विकासाचा कुठलाच अजेंडा त्यांच्याकडे नाही. धर्म, जात पंथाचे राजकारण करणे हेच काँग्रेसचे काम आहे.

# महाराष्ट्रातील खासगी प्रसूती रुग्णालयांसाठी आरोग्य विभागाचा 'लक्ष्य-मान्यता' उपक्रम

मुंबई :- राज्यातील खासगी प्रसूती रुग्णालयांमध्ये सेवा गुणवत्ता वाढवून प्रसुतीदरम्यान होणाऱ्या मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने लक्ष्य-मान्यता (LaQshya-Certification) हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. हा उपक्रम राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांमध्ये दर्जात्मक, सुरक्षित आणि आदरयुक्त प्रसूती सेवा (Respectful Maternity Care) सुनिश्चित करण्यासाठी राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राने मागील काही वर्षांत मातामृत्यू कमी करण्यामध्ये उल्लेखनीय प्रगती केली असून, आता हा प्रयत्न खासगी क्षेत्रापर्यंत विस्तारित करण्यात आला आहे.

लक्ष्य-मान्यता कार्यक्रमाचा मुख्य हेतू प्रसूतीदरम्यान माता आणि नवजात बालकांचे मृत्यूदर कमी करणे, खासगी रुग्णालयांमधील सेवा गुणवत्ता, रुग्ण सुरक्षा आणि रुग्ण काळजीत सुधारणा करणे, प्रत्येक महिलेला सुरक्षित व आदरयुक्त प्रसूती अनुभव मिळवून देणे आहे.

हा उपक्रम महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॉकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (FOGSI) आणि गहळिशसे या आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे.

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## बालदिन आणि मुलांना ऐकणारा समाज

संभाजी लव्हटे दरवर्षी १४ नोव्हेंबरला देशभरात रंगीत फुगे, मिठाई, गाणी, नृत्य आणि हशा यांच्या रूपात बालदिन साजरा केला जातो. शाळांची प्रांगणे फुलून जातात. मुलांच्या चेहर्यावर हसू उमटतं; पण त्या हसर्या चेहर्यांच्या मागे अनेकदा काही आवाज असतात, ते आवाज आहेत अवास्तव अपेक्षांच्या ओझ्याखाली दबलेल्या मुलांचे, न ऐकलेल्या प्रश्नांचे आणि न मांडता आलेल्या स्वप्नांचे. बालदिन म्हणजे फक्त सण नाही, तो चिंतनाचा दिवस आहे. आपण आपल्या मुलांचं खरंच ऐकतो का? त्यांना बोलू देतो का? त्यांच्या डोळ्यांतील प्रश्न समजून घेतो का?

भारतात १४ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय बालदिन म्हणून साजरा केला जातो. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे मुलांवर अतोनात प्रेम होतं. ते नेहमी म्हणायचे, 'आजची मुले उद्याचा भारत घडवतील'. त्यांच्या निधनानंतर १९६४ मध्ये भारत सरकारने ठरवलं की, त्यांच्या जयंतीला 'बालदिन' म्हणून साजरा करायचा. त्याआधी भारतात बालदिन २० नोव्हेंबर रोजी साजरा केला जात असे. कारण, तो दिवस संयुक्त राष्ट्रसंघाने ठरवलेल्या 'वर्ल्ड चिल्ड्रन्स डे'शी सुसंगत होता; पण भारताने आपली वेगळी ओळख निर्माण केली. १४ नोव्हेंबर–बालदिन–चाचा नेहरूंच्या मुलांप्रती असलेल्या प्रेमाचे प्रतीक म्हणून.

बालदिनाच्या निमित्ताने आपण जेव्हा 'मुलांना ऐकणार्या समाजाची' कल्पना करतो तेव्हा मुलांना ऐकणारा समाज म्हणजे काय, हे समजून घ्यायला हवं. मुलांना ऐकणारा समाज म्हणजे फक्त त्यांचे बोलणे ऐकणे नव्हे, तर त्यांच्या भावना, कल्पना आणि स्वप्नांना महत्त्व देणारा समाज अपेक्षित आहे. आपण त्यांना नेहमी शिकवतो; पण त्यांच्याकडून शिकतो का? आपण त्यांना बोलतो, आदेश देतो, पण ऐकतो का? मुलांना ऐकण म्हणजे होयं, 'तुझं मत महत्त्वाचं आहे' अस सांगणं. मुलं बोलतात; पण केवळ शब्दांत नाही, तर त्यांच्या नजरेत, खेळात आणि शांततेतही ती आपल्याला काही सांगतात. जो समाज हे ओळखतो, तोच खर्याअर्थाने प्रगत होतो.

मी प्राथमिक शिक्षक म्हणून अनेक वर्षे काम करतोय. दररोज माझ्या वर्गात मी शेकडो निरागस चेहरे पाहतो. काही उत्साही, काही घाबरलेले, काही दडपलेले. दररोज एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, बर्याचदा पालकांची स्वप्नं मुलांच्या खांद्यांवर जड ओझी बनून राहतात. मला तो प्रसंग अजून आठवतो. चौथीतला एक विद्यार्थी अभ्यासात थोडा मागे होता. त्याचे पालक नेहमी म्हणायचे, 'तो पहिल्या तीन मध्ये आला नाही, तर मला लाज वाटते'. तो विद्यार्थी एकदा मला म्हणाला, 'सर, आई मला घरी खेळू देत नाही. ती म्हणते अभ्यासच आयुष्य आहे.' त्या क्षणी मला जाणवलं, आपण मुलांना उंच भरारी शिकवतो; पण उडायला पंख देत नाही. अजून एक प्रसंग, वर्गात एक मुलगी गप्प, शांत आणि काहीतरी दडपणाखाली असल्यासारखी भयभीत असायची. मी तिला विचारलं, 'तू एवढी गप्प का असतेस?' ती म्हणाली, 'सर, घरी मी बोलले तर बाबा म्हणतात, तुझं काम आहे फक्त ऐकायचं.' त्या क्षणी मला जाणवलं बालहक्क म्हणजे केवळ शिक्षण नव्हे, स्वतःचं मत मांडण्याचाही अधिकार आहे. मी शालेय स्पर्धात्मक परीक्षांची मुलांकडून तयारी करून घेतो; पण मी कधीच मुलांवर ताण, भीती किंवा ओझं निर्माण केलं नाही. माझं स्पष्ट मत आहे, स्पर्धा म्हणजे संघर्ष नव्हे. ती आनंदाने घेतलेली संधी आहे. माझ्या मते, बालहक्क म्हणजे फक्त 'शिक्षणाचा अधिकार' नाही, तर आनंदाने शिकण्याचाही अधिकार आहे.

# राजकीय पक्षांची अंतर्गत लोकशाही आणि जनकल्याणवाद

भारतीय लोकशाहीचे वैभव हे केवळ निवडणुकांत वाढणाऱ्या मतदानाच्या प्रमाणात किंवा खांद्याला खांदा लावणाऱ्या पक्षीय स्पर्धेत नाही; तर त्याची खरी ताकद आहे–राजकीय पक्षांच्या अंतर्गत लोकशाहीमध्ये. कारण लोकशाही ही फक्त मतपेट्यांपुरती मर्यादित राहत नाही, ती पक्षाच्या रचना, नेतृत्व–निर्मिती, निर्णयप्रक्रिया आणि सामूहिक जबाबदारीमधून मूळ धरते. आज भारतात अनेक पक्ष जनकल्याणवादाच्या नावाखाली आपली राजकीय ओळख मजबूत करत असताना, अंतर्गत लोकशाहीचे स्वरूप नेमके कसे आहे, हा एक महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. भारतीय वंशाचे झोहरान ममदानी यांची न्यूयॉर्क शहराच्या महापौरपदी निवड झाली, या घटनेला पक्षांतर्गत निवडणुकीच्या पैलूचा संदर्भ आहे. महापौर होण्याआधी त्यांना पक्षांतर्गत निवडणूक लढवावी लागली, त्यानंतर त्यांना उमेदवारी मिळाली. त्यांची निवड मुख्य प्रवाहातील अनेक गृहीतकांना उलथवून टाकणारी ठरली आहे. आज भारतीय राजकारणात नेतृत्वनिर्मिती ही बहुतेक वेळा वंशपरंपरा, राजकीय वारसदारी किंवा गटबाजीवर आधारित आढळते. अशा वेळी एखाद्या साधारण कार्यकर्त्याची, गट आधार नसलेल्या तरुणाची आणि सामान्य कुटुंबातून आलेल्या व्यक्तीची नेतृत्वपदी निवड होणे ही अंतर्गत लोकशाहीची ताकद अधोरेखित करणारी घटना ठरते. परिणामी पक्षाच्या अंतर्गत प्रक्रियेतून निर्माण झालेलं नेतृत्व लोकशाहीची खरी उंची दाखवते.




भारतीय राजकारणात अनेक पक्ष स्वतःला जनकल्याणवादी म्हणून मांडत असतात. परंतु जनकल्याणवाद केवळ जनसामान्यांना आर्थिक सुविधा, अनुदाने देण्यात नसतो; तो नेतृत्वनिर्मितीतही असायला हवा. कारण जोपर्यंत जनतेच्या वास्तविक जीवनातून नेतृत्व जन्म घेत नाही, तोपर्यंत जनकल्याणवाद हा फक्त घोषणांमध्येच अडकून राहतो. लोकशाहीत खरे लोकप्रतिनिधित्व तेव्हाच साकारते, जेव्हा नेतृत्व समाजातून वर येते, वरून खाली लादले जात नाही.



भारतातील अनेक राजकीय पक्षांत आज अंतर्गत निवडणुका, पारदर्शक प्रक्रिया किंवा कार्यकर्त्यांना निर्णयात सहभागी करण्याची पद्धत फारच अल्प प्रमाणात दिसते. नेतृत्व निवडीतील अपारदर्शकता, नियुक्त्यांतील विशेष गटांचा प्रभाव आणि विचारमंथनाची घटती संस्कृती–हे चित्र चिंताजनक आहे. याउलट काही उदाहरणे जिथे कार्यकर्त्यांचे मत, स्थानिक पातळीवरील सक्रियता आणि जनआधार या गोष्टींना प्राधान्य दिले जाते, तिथेच खरी लोकशाही घडताना दिसते. राजकीय पक्षांची अंतर्गत लोकशाही ही केवळ एक आदर्श कल्पना नाही; ती लोकांना मिळणाऱ्या सेवांची गुणवत्ता ठरवते. जेथे पक्षांतर्गत लोकशाही असेल, तिथे नेतृत्व अधिक जबाबदार, निर्णयप्रक्रिया अधिक पारदर्शक आणि प्रशासन अधिक सर्वसमावेशक बनते. कारण अशा ठिकाणी नेतृत्वाला नियुक्त करणे नव्हे, तर सिद्ध करणे महत्त्वाचे असते. जनतेत काम करणारा, समस्यांवर बोलणारा, स्थानिक पातळीवर उपलब्ध राहणारा कार्यकर्ता वर येतो आणि तो लोकांची भाषा समजतो. याउलट वरून थोपवलेले नेतृत्व जनतेपासून दुरावलेले राहते आणि जनकल्याणवाद घोषणांमध्ये हरवतो. जनतेच्या प्रश्नांना प्रत्यक्ष अनुभवलेले नेतृत्व अधिक संवेदनशील असते. यामुळेच अंतर्गत लोकशाहीचा आणि जनकल्याणवादाचा संबंध अधिक घट्ट होतो. भारतीय लोकशाहीचे संरचनात्मक सौंदर्य म्हणजे विविधता. ही विविधता राजकीय पक्षांच्या नेतृत्वात दिसली पाहिजे. सामाजिक, आर्थिक, भाषिक विविधतेचे प्रतिनिधित्व करणारे नेतृत्व जेव्हा पुढे येते, तेव्हा राजकारण अधिक लोकाभिमुख बनते. ही प्रेरणा भारतीय लोकशाहीला अधिक बळकट बनवते. अर्थात, भारतात अंतर्गत लोकशाहीची यात्रा अजूनही अपूर्ण आहे. अनेक पक्षांत अजूनही निवडणुका नसणे, नेतृत्वाची अनेक दशकांची पकड, कुटुंबराजकारणाचे वर्चस्व अशा आव्हानांचा सामना करावा लागत आहे. राजकीय पक्षांनी आता जनकल्याणवादाची नव्याने व्याख्या करणे आवश्यक आहे. अनुदाने देणे, मोफत सुविधा जाहीर करणे आणि अल्पकालीन लाभ देणे हा टिकाऊ जनकल्याणवाद नाही. खरा जनकल्याणवाद म्हणजे–लोकशाही आधारित, सर्वसमावेशक, जबाबदार आणि पारदर्शक नेतृत्वाच्या निर्मितीद्वारे दीर्घकालीन सामाजिक न्याय साधणे. अशा नेतृत्वातून प्रशासन सुधारते, धोरणे वास्तवाला भिडतात आणि नागरिकांना परतावा मिळतो. आधुनिक भारतात राजकीय स्थैर्य, आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय या तीन खांबांना मजबूत करण्यासाठी अंतर्गत लोकशाही अत्यावश्यक आहे. जोपर्यंत पक्षांतर्गत लोकशाही मजबूत होत नाही, तोपर्यंत व्यापक लोकशाहीची उंची मर्यादित राहते. समाजाच्या बदलत्या आकांक्षा आता नेतृत्वनिर्मितीचाही मार्ग बदलत आहेत. भारतीय लोकशाही पुढे न्यायची असेल, तर पक्षांनी जनतेला आणि कार्यकर्त्यांना निर्णयप्रक्रियेच्या मध्यभागी आणणे आवश्यक आहे. जोपर्यंत नेतृत्वाची निवड लोकांच्या हृदयातून होत नाही, तोपर्यंत लोकशाही लोकाभिमुख होणार नाही. त्यामुळे अंतर्गत लोकशाही ही भविष्यातील भारतीय राजकारणाची सर्वात महत्त्वाची अट ठरणार आहे. लोकशाही जिंकत ठेवली पाहिजे, फक्त मतपेट्यांत नव्हे, तर पक्षाच्या घरातही.

*******

लेखक : दादाराव कैलास तायडे
(राज्यशास्त्र अभ्यासक)

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मागोव्याची गरज

प्रा. डॉ. अशोक शिंदे देशभर आणि राज्यात राबविण्यात येत असलेल्या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने उच्च शिक्षण अधिक विद्यार्थीकेंद्रित, कौशल्याधारित आणि बहुविषयक (मल्टिडिसिप्लिनरी) करण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षणाच्या रचनेत नवा दृष्टिकोन येताना उच्च शिक्षणामधील विविध पैलूंवर त्याचे बहुआयामी परिणाम दिसू लागले आहेत. उच्च शिक्षणामध्ये हे वाढते ओझे की परिवर्तनाचा प्रवास, या अनुषंगाने विविध मतप्रवाह पुढे येत आहेत. बदलांच्या या लाटेत सर्वाधिक परिणाम म्हणजे प्राध्यापकांचा अतिरिक्त कार्यभार! देशभरात आणि राज्यात साधारणतः गेल्या चार दशकांनंतर (१९८६) प्रथमच उच्च शिक्षणात नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यात येत आहे.

ज्ञान मिळविण्याचा स्रोत म्हणजे शिक्षण असे म्हटले जाते. महात्मा फुले, आगरकर, कर्मवीर भाऊराव पाटील, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, पंजाबराव देशमुख, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अशा अनेक महनीय सुधारकांनी संघर्ष करून, त्याग करून बहुजनांना शिक्षणाचा अधिकार मिळवून त्यांना सुधारण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य केले. अशा तत्कालीन व्यवस्थेमध्ये शिक्षणातून सुधारणेचा पाया अशा अनेक महनीय व्यक्तींनी घातला. त्यानंतर पुढील काही कालखंडानंतर शिक्षण व्यवस्थेमध्ये राधाकृष्ण आयोग, मुदलियार आयोग, कोठारी आयोग अशा अनेक आयोगांनी राष्ट्रीय शिक्षणाबाबत दुरुस्ती आणि शिक्षणाचे उद्देश स्पष्ट करत शिक्षण हा देशातील प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे असे मुद्दे अधोरेखित करून कार्यवाही सुरू ठेवली.



आता नवे शैक्षणिक धोरण २०२० येऊन त्याची अंमलबजावणी सुरू झाली असताना धोरणांच्या प्रत्यक्ष कार्यवाहीचा मागोवादेखील घेणे आवश्यक बनत आहे. कारण, १९८६ च्या शैक्षणिक धोरणामध्ये महाराष्ट्राचे महान सुपुत्र जे. पी. नाईक यांनी मांडलेले विचार आणि त्याचे चिंतन, मननदेखील करणे आवश्यक आहे. या नव्या शैक्षणिक धोरणाबाबत मध्यंतरी एका छोट्या पुस्तिकेमध्ये (जून २०२१) पद्मश्री डॉ. गणेश देवी यांनी म्हटलं आहे की, एका बाजूला संपूर्ण भारतातल्या नव्या पिढीला प्राचीन सनातनी परंपरेकडे न्यायचं आणि दुसर्या बाजूला ज्यांना शिक्षणाची खरोखर गरज आहे, त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करायचं. तसेच या नव्या प्रक्रियेमध्ये जीवनाच्या मूल्यांमध्ये 'स्वातंत्र्य' आणि 'समता' हे शब्द नाहीत. शिक्षणातून मुलांना विवेक बुद्धी द्यायची नाही, तर अज्ञाधारकता हे एकच मूल्य रुजवायचे. मार्च २०२५ मध्ये याच पुस्तिकेची दुसरी आवृत्ती निघाली. त्यामध्ये कॉम्रेड धनाजी गुरव यांनी म्हटले आहे की, नव्या शैक्षणिक धोरणातील मुद्दा क्रमांक ४.४३ नुसार या व्यवस्थेतील गुरू हे विद्यार्थ्यांचे सरळ दोन भाग करतील. एक सुमार विद्यार्थी आणि दुसरे बुद्धिमान विद्यार्थी. मग, या बुद्धिमान विद्यार्थ्यांची वेगळी काळजी घेतली जाईल आणि मागास विद्यार्थ्यांना वार्यावर सोडले जाईल.

अशा पार्श्वभूमीवर आता नव्या धोरणामध्ये विषय संख्या वाढली आणि जबाबदार्या अनेकपटीने वाढल्या. या जबाबदार्या अन् प्राध्यापकांचा कार्यभार अतिरिक्त होत असताना ना रिक्त जागा भरल्या गेल्या ना तत्सम सुविधांसह वर्गखोल्यांची व्यवस्था. पूर्वी विद्यार्थ्यांकडे एकच मुख्य विषय आणि ठरावीक अभ्यासक्रम असायचा; मात्र आता प्रत्येक विद्यार्थ्याला मुख्य (मेजर) आणि पूरक (मायनर) विषय निवडण्याची संधी आहे. यामुळे प्रत्येक शिक्षकाला विविध विषय संयोगानुसार वर्ग घ्यावे लागतात. उदाहरणार्थ, अर्थशास्त्राचा शिक्षक आता पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनाही शिकवतो, तर राज्यशास्त्राचा शिक्षक समाजकार्य किंवा मानसशास्त्राशी संबंधित विद्यार्थ्यांनाही अध्यापन करतो. या नव्या प्रणालीने शिक्षणाचा विस्तार झाला असला, तरी शिक्षकांच्या नियोजनाचा, तयारीचा आणि मूल्यमापनाचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. याउलट काही शाखांमधून, महाविद्यालयांमधून नव्या शैक्षणिक धोरणाचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे कायम शिक्षकांचा कार्यभार कमी होऊन असे शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळेच नवे धोरण अमलात आणताना कुठेतरी त्यातील धोरणांबद्दल मागोवा घेण्याची, विचारमंथन होण्याची गरज आहे. या शिक्षण प्रक्रियेत अभ्यासक्रमांच्या संख्येत वाढ झाली, विषयांच्या रचनेत गुंतागुंत आली. दुसरीकडे तात्पुरत्या म्हणजेच सीएचबी शिक्षकांवर कामाचा डोंगर टाकला जात आहे. काम अधिक, मानधन कमी आणि भविष्य अनिश्चित अशी स्थिती दिसत आहे.

राज्य शासन, विद्यापीठे आणि शिक्षण संस्था यांनी आता या स्थितीकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. एन.ई.पी. लागू करताना शिक्षकांचा कार्यभार, विषयांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रमाण आणि प्रत्यक्ष कामाचे तास यांचा सखोल अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. यातील शिक्षकांना नव्या प्रशिक्षणाची गरज आहे का, याचा विचार होणे आवश्यक आहे. शिक्षणाचे खरे परिवर्तन केवळ अभ्यासक्रम बदलण्यात नाही, तर शिक्षकाला बळ देण्यात आहे. धोरणे उत्कृष्ट असू शकतात; परंतु त्यांची अंमलबजावणी शिक्षकांवर अवलंबून असते. शिक्षकच थकले, तणावाखाली गेले आणि त्यांच्या योगदानाला योग्य मान्यता मिळाली नाही, तर 'शिक्षणातील क्रांती' हे केवळ घोषवाक्य ठरेल. गेल्या तीन–चार दशकांमध्ये माहिती–तंत्रज्ञानाचे युग आता एआय तथा आर्टिफिशियल इंटेलिजन्सकडे चालले. जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर सर्वच सामाजिक, औद्योगिक, व्यापारी स्तरावर, वेगवेगळ्या पैलूंवर अमूलाग्र बदल होत असताना शिक्षण व्यवस्थेत देखील कालानुरूप बदल करणे आवश्यक बनले आहे. नवे शैक्षणिक धोरण हादेखील त्याच बदलांचा एक भाग आहे. त्यामुळे या नव्या धोरणातील एकूणच रचनेला बगल न देता त्यातील सकारात्मक बाबींना सकारात्मक दृष्टीने पाहून वाटचाल करणे आवश्यक आहे.

## होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स लावताना स्थानिक प्राधिकरणाची परवानगी बंधनकारक

लातूर :- राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. ही निवडणूक संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच त्या निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या ग्रामीण क्षेत्रामध्ये निवडणूक कालावधीत होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स, जाहिरात लावताना स्थानिक प्राधिकरणाची परवानगी बंधनकारक राहणार आहे. तसेच परवानगी संपल्यानंतर इमारती, मालमत्ता पूर्ववत करून घेणे, जाहिराती तत्काळ काढून घेणे आवश्यक आहे. तसेच या क्षेत्रात शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात विद्रुपता करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. ३ डिसेंबर २०२५ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

## आदर्श आचारसंहिता काळात शासकीय कार्यालयांच्या परिसरात उपोषण, मोर्चा, निदर्शने, घेराव करण्यास मनाई

लातूर :- राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या काळात उपोषण, मोर्चा, निदर्शने, घेराव आणि आंदोलने करण्यास मनाई करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निर्गमित केले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या या आदेशानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाच्या परिसरात तसेच सर्व उपविभागीय कार्यालये, तालुका दंडाधिकारी, सर्व शासकीय व सर्व निमशासकीय कार्यालये, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण, आत्मदहन इत्यादी विविध प्रकारची आंदोलने करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे. ३ डिसेंबर २०२५ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

## स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणुकीत नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध

लातूर :- राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. ही निवडणूक संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी या निवडणूक काळात नमुना मतपत्रिका छपाईबाबत निर्बंध घालण्यात आले आहेत. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे व आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे या बाबींवर निर्बंध घालण्यात आले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी नमुना मतपत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात येत असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

## धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था, सार्वजनिक ठिकाणांच्या जवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध

लातूर :- राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या काळात धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निर्गमित केले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या या आदेशानुसार निर्गमित केलेले हे आदेश ३ डिसेंबर २०२५ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

## निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलके, झेंडे लावणे इत्यादी बाबीस प्रतिबंध

लातूर:- राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यादिवशीपासून निवडणूक कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या नगर परिषद, नगरपंचायत निवडणुकीची प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पडावी, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार स्थानिक स्वराज्य मतदारसंघ कार्यक्षेत्रासह या निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या ग्रामीण क्षेत्रात वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबीसाठी निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यानुसार फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रीन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनावर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजुनेच लावण्यात यावा. इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. फिरत्या वाहनावर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधीत पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या वाहना व्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर लावता येणार नाही. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या या आदेशानुसार निर्गमित केलेले हे आदेश ३ डिसेंबर २०२५ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

## शासकीय कार्यालये, विश्रामगृहे परिसरात मिरवणूका, घोषणा, उपोषण, सभा घेण्यावर निर्बंध

लातूर :- राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार स्थानिक स्वराज्य मतदारसंघ कार्यक्षेत्रात निवडणूक कालावधीत शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालये, विश्रामगृहे इत्यादी परिसरात मिरवणूका घोषणा देणे, सभा घेणे इत्यादीवर निर्बंध घातले आहेत.

## खाजगी व्यक्तीच्या जागेवर, सार्वजनिक जागेवर झेंडे,भितीपत्रके लावण्यास निर्बंध

लातूर :- राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार निवडणूक क्षेत्रात व निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या ग्रामीण क्षेत्रात निवडणूकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, इमारत, आवार, भिंत आदी ठिकाणांच्या संबंधित जागा मालकाच्या परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय प्रचारासाठी वापर करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. हे आदेश दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजीपर्यंत अंमलात राहतील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ध्वनिक्षेपक वापरावर निर्बंध लागू

लातूर :- राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या निवडणुका विना अडथळा व शांततेत पार पडण्यासाठी निवडणुकीच्या काळात ध्वनीक्षेपक (लाउडस्पीकर) वापरावर प्रतिबंध घालण्यात आले आहेत. याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निर्गमित केला आहे. कोणत्याही वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून त्याचा वापर फक्त सकाळी ६ वाजेलपासून ते रात्री १० वाजेपर्यंत संबंधित पोलीस अधिकारी यांची रीतसर परवानगी घेवून करता येईल. फिरत्या वाहनावर ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही, विशिष्ट ठिकाणी थांबूनच ध्वनीक्षेपकाचा वापर करावा. सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार किंवा इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे.

## सार्वजनिक इमारतींच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, रहदारीस अडथळा निर्माण न होवू देण्यासाठी निर्बंध

लातूर :- राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा व रेणापूर या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला असून, कार्यक्रम घोषीत केल्याच्या दिनांकापासून निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. या काळातराजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणूकीच्यासंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्पलेट्स, कटआऊटस, होर्डींग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होवू शकतो. तसेच त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे त्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ अन्वये निवडणूकीचे सर्व साहित्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर रहदारीस अडथळा होईल किंवा अपघात होईल, अशा पध्दतीने लावण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे निर्बंध घालण्यात येत असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

## उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाने केज शहरातील अवैद्य धंद्यावर केली कारवाई




केज/प्रतिनिधी पोलीस अधीक्षक बीड व अप्पर पोलीस अधीक्षक अंबेजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी केज यांच्या पथकाने शहरातील अवैद्य धंद्यावर कारवाई केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक १३ नोव्हेंबर रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या सुमारास श्री वेंकटराम भा.पो.से. यांना एका गुप्त खबर मार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या आदेशाने पोलीस उपनिरीक्षक संजय फड,पोह/२०११अशोक खेलबुडे,पोह/१५९७ उत्तरेश्वर केदार, पोअं/२०९७ कुलदीप खंदारे नेमणूक, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आंबेजोगाई यांनी केज शहरातील मेन रोडवरील वसुंधरा बँकेच्या मागे बंद खोली त इसम नामे उत्तम विश्वनाथ वाघमारे वय ५५ वर्षे रा. फुलेनगर केज हा विनापरवाना बेकायदेशीररित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी कल्याण नावाचा मटका जुगार लोकांकडून पैसे घेऊन आकड्यावर पैसे लावून खेळत व खेळवीत असताना मिळून आला. त्यास ताब्यात घेऊन त्याची अंग झडती घेतले असता त्याच्या ताब्यात १६ हजार ३९० रुपयाचा मुद्देमाल नगदी रुपये मोबाईल व जुगाराचे साहित्य मिळून आले. पोलीस उपनिरीक्षक संजय फड, नेमणूक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आंबेजोगाई, यांच्या फिर्यादीवरून उत्तम विश्वनाथ वाघमारे वय ५५ वर्ष रा. फुलेनगर केज व गणेश खराडे रा. केज यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या सुमारास श्री वेंकटराम भा.पो.से. यांना मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे त्यांच्या आदेशाने पोलीस उपनिरीक्षक संजय फड,पोह/२०११ अशोक खेलबुडे,पोह/१५९७ उत्तरेश्वर केदार व पोअं/२०९७ कुलदीप खंदारे नेमणूक, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आंबेजोगाई यांनी शहरातील मेन रोडवरील वसुंधरा बँकेच्या मागे बंद खोलीत इसम नामे शिवराज भगवानराव पाटील वय ४० वर्षे राहणार धारूर रोड केज व शेख शकील महमूद वय ४२ वर्षे राहणार रोजा मोहल्ला केज हे विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी कल्याण नावाचा मटका जुगार लोकांकडून पैसे घेऊन आकड्यावर पैसे लावून खेळत व खेळवीत असताना मिळून आले. त्यास ताब्यात घेऊन त्यांची अंग झडती घेतली असता त्यांच्या ताब्यात ८८ हजार ९६० रुपयाचा मुद्देमाल नगदी रुपये, मोटर सायकल, मोबाईल व जुगाराचे साहित्य मिळून आले पोलीस हवालदार अशोक खेलबुडे नेमणूक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय अंबाजोगाई यांच्या फिर्यादीवरून शिवराज भगवानराव पाटील वय ४० वर्षे राहणार धारूर रोड केज, शेख शकील महेमुद वय ४३ वर्षे राहणार रोजया मोहल्ला केज, गणेश खराडे राहणार केज व शेख चांद सेठ राहणार केज यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक बीड, अप्पर पोलीस अधीक्षक आंबेजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री वेंकटराम (भापोसे), पोलीस उपनिरीक्षक संजय फड, पोलीस हवालदार अशोक खेलबुडे, पोलीस हवालदार उत्तरे'श्वर केदार व पोलीस अमलदार कुलदीप खंदारे यांच्या पथकांनी केली आहे.

## चिंचेचं नाव कढल्यानंतर तोंडाला पाणी सुटते? मग पारंपरिक पद्धतीमध्ये बनवा आंबटगोड चिंचेची चटणी, भाकरीसोबत लगेच सुंदर

आंबटगोड चवीची चिंच खायला सगळ्यांचं खूप जास्त आवडतात. चिंचेचं नाव ऐकल्यानंतर सगळ्यांच्या तोंडाला पाणी सुटते. जेवणाच्या ताटात चटणी असेल तर दोन घास जेवण जास्त जाते. खोबऱ्याची चटणी, कैरीची चटणी, लसूण चटणी इत्यादी अनेक वेगवेगळ्या पदार्थांपासून चटणी बनवल्या जातात. पण आज आम्ही तुम्हाला पारंपरिक पद्धतीने चिंच चटणी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. चिंच चटणीसोबत गरमागरम भाकरी, चपाती अतिशय सुंदर लागते. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांमध्ये पारंपरिक पदार्थ कायमच बनवले जातात. आंबटगोड चवीची चिंच चटणी गूळ, लसूण इत्यादी अनेक वेगवेगळ्या पदार्थांपासून बनवली जाते. बाजारात चिंच चटणी सहज उपलब्ध होते. पण यामध्ये वापरल्या जाणाऱ्या पदार्थांमुळे बऱ्याचदा चटणी खराब होऊन जाते. त्यामुळे सोप्या पद्धतीमध्ये तुम्ही घरच्या घरी सुद्धा चिंच चटणी बनवू शकता. जाणून घ्या चिंच चटणी बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य: चिंच लसूण मीठ हिरव्या मिरच्या शेंगदाणे गूळ कोथिंबीर तेल बोर मिरची

कृती: चिंच चटणी बनवण्यासाठी सर्वप्रथम, कच्ची चिंच स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर साल काढून चिंचेचे बारीक तुकडे करा. मिक्सरच्या भांड्यात बारीक केलेले चिंच, लसूण पाकळ्या, हिरव्या मिरच्या, शेंगदाणे, गूळ, कोथिंबीर आणि थोडस पाणी घालून चटणी बारीक वाटून घ्या. वाटून घेतलेली चटणी मोठ्या वाटीमध्ये काढून घ्या. चटणी बनवताना त्यात जास्त पाणी घालू नये. फोडणीच्या वाटीमध्ये तेल गरम करून त्यात जिरे, आलं-लसूण पेस्ट आणि बोरी मिरची घालून व्यवस्थित मिक्स करा. तयार केलेली फोडणी आणि चवीनुसार मीठ चटणीमध्ये घालून चटणी व्यवस्थित मिक्स करून घ्या. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली आंबट गोड चिंच चटणी.



## इनहेलर किंवा नोज स्प्रे वापरताय ? मग आताचा सोडा ही सवय, डॉक्टरांनी सांगितली धक्कादायक माहिती

इनहेलर किंवा नोज स्प्रे वापरताय ?
मग आताचा सोडा ही सवय
डॉक्टरांनी सांगितली धक्कादायक माहिती

सततच्या धावपळीमुळे आणि प्रदुषणामुळे खूप जणांना ॲलर्जीची सर्दी जाणवते. हवेतील प्रदुषण किंवा धुळीमुळे शिंका येणं, सर्दी होणं या प्रकार दिसून येतो. यामुळे अनेकजण इन्हेलर किंवा नोज स्प्रे वापरतात. मात्र याची सवय आरोग्यासाठी धोकादायक असल्याचं आरोग्यतज्ज्ञांनी सांगितलं आहे. अति तिथे माती असं एक म्हण आहे. कुठल्याही गोष्टी प्रमाणाबाहेर वापर झाला तर त्याची माती ही होतेच. हेच औषधांच्या बाबतीतही लागू होतं. सर्दी झाल्यावर अनेकांना इन्हेलर किंवा नोज स्प्रे वापरण्याची सवय असते. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे इन्हेलर आणि नोज स्प्रे आहेत. याप्रत्येकाचा परिणाम काही मिनिटभरात होतो आणि नाक मोकळं होतं कधी बारा तास तर आठ तास असा याचा कालावधी असतो. याने होतं काय तर, सर्दीवर याचा तात्पुरता परिणाम होत असला तरी, याची सवय होणं हृदयाच्या आजारांना आमंत्रण देतं, कसं ते जाणून घेऊयात.

आरोग्य तज्ञ सांगतात की, इन्हेलर किंवा नोज स्प्रेतील स्टेरॉइड घटक श्वसनमार्गातील सूज कमी करतात, याने नाक मोकळं होतं खरं मात्र त्याचा अतिवापर केल्यास नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊ लागते. त्यामुळे लहानसहान सर्दी, खोकला किंवा धुळीचा संपर्क यामुळेही त्रास वाढतो. काही प्रकरणांमध्ये नाकातील त्वचा याने कोरडी पडते, त्यामुळे नाकातून रक्त येणे, गंध जाणे अशा समस्या जाणवतात. त्याचशिवाय नाकाच्या संबंधित समस्या देखील निर्माण होऊ शकते.इन्हेलरचा अति वापर केल्यास याचा परिणाम घशावर देखील जाणवतो. . एवढंच नाही तर भविष्यात या सवयी हृदय विकाराचा झटका येण्यास देखील कारणीभूत ठरु शकते.

सतत घसा बसणे, आणि हृदयगती वाढणे असे गंभीर परिणाम यामुळे दिसून येतात. अनेक रुग्ण इन्हेलर किंवा नोज स्प्रे औषध डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय दीर्घकाळ वापरतात. मात्र ही सर्वात मोठी चूक ठरते.तज्ज्ञ सुचवतात की, या औषधांचा वापर केवळ तात्पुरता आणि डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखालीच करावा. तसेच धूळ, धूर, परफ्युम, पाळीव प्राणी यांसारख्या ॲलर्जीक घटकांपासून दूर राहणे, घरातील हवा शुद्ध ठेवणे आणि श्वसनव्यायाम (प्राणायाम) करणे हा उत्तम पर्याय ठरतो.शेवटी, इन्हेलर आणि नोज स्प्रे हे उपाय आहेत, कायमस्वरूपी समाधान नाही. त्यामुळे सहज सवय न बनवता वैद्यकीय सल्ल्यानुसार वापर करणं गरजेचं आहे.

आजीबाईच्या बटव्यातील आयुर्वेदिक उपाय! थंडीमुळे घशात वाढलेली खवखव कमी करण्यासाठी प्या औषधी काढा,नाक चोंदण्यापासून मिळेल आराम



दमा, सायनस, ॲलर्जी, श्वास घेण्याचा त्रास किंवा सतत सर्दी-खोकला अशा समस्या आजच्या बदलत्या हवामानात आणि प्रदूषणामुळे सर्वसामान्य झाल्या आहेत. यावर तातडीचा उपाय म्हणून अनेक जण इन्हेलर किंवा नोज स्प्रे वापरतात. काही लोक डॉक्टरांच्या सल्ल्याने हे वापरतात, तर अनेकजण स्वतःहूनच सवय लावून घेतात. पण आता तज्ञांनी यावर चिंता व्यक्त केली आहे. तुम्हालाही नोज स्प्रे किंवा इन्हेलरची सवय असेल तर तुमचं आरोग्य दीर्घकाळासाठी धोक्यात येऊ शकतं. या औषधांमध्ये प्रामुख्याने स्टेरॉइड्स, डीकॉन्जेस्टंट्स आणि केमिकल घटक असतात. हे घटक नाकातील किंवा श्वसनमार्गातील सूज कमी करून काही मिनिटांत आराम देतात. म्हणूनच लोकांना तत्काळ फरक जाणवतो. मात्र याचा अतिवापर अनेक आजारांना आमंत्रण देतो. त्यामुळे साधी सर्दी असो किंवा ॲलर्जीची सर्दी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार स्वतःचे स्वतः करु नयेत.

# लातूर मनपा निवडणुकीसाठी काँग्रेसची तयारी जोरात: इच्छुक उमेदवारांकडून अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरु

लातूर /प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने जोरदार तयारी सुरू केली आहे. लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने इच्छूक उमेदवारांकडून अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया जाहीर केली आहे. अर्ज स्वीकृतीसाठी विशेष व्यवस्था इच्छूक उमेदवारांचे अर्ज काँग्रेस भवन, लातूर येथे दि १५ नोव्हेंबर पासून २३ नोव्हेंबर पर्यंत स्वीकारले जाणार आहेत. ही प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने एका विशेष समितीची स्थापना केली आहे.

या समिती कडे अर्ज स्वीकारण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी असून या समितीत बालाप्रसाद बिदादा, दगडूआप्पा मिटकरी, नामदेव इगे, रफीक सय्यद,प्रा. सिद्राम कटारे, प्रा.प्रवीण कांबळे,संजय निलेगावकर,मनोज देशमुख या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे . हे सर्व पदाधिकारी काँग्रेस भवन येथे सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत उपस्थित राहून सर्व इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज स्वीकारतील आणि पक्षाच्या निवडणूक तयारीतील महत्त्वपूर्ण टप्प्याची पूर्तता करतील. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तयारी काँग्रेस पक्षाचे राज्याचे माजी मंत्री, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण ताकदीने काँग्रेस निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. महानगरपालिकेवर काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवण्यासाठी कार्यकर्ते आणि पदाधिकारी सज्ज झाले असून निवडणुकीची जोरदार तयारी सुरू आहे. इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवण्याची प्रक्रिया ही त्याच तयारीचा एक भाग आहे. या संपूर्ण प्रक्रियेची माहिती लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षातील उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सकल मराठा परिवाराचे १६ नोव्हेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिर: जीवनदान देण्याची संधी

लातूर : राज्य रक्त संक्रमण परिषद (SBTC) मुंबई यांच्या वतीने राज्यातील सर्व सामाजिक संस्था आणि संघटना यांना रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन केले आहे. महाराष्ट्र राज्यात आणि विशेषतः लातूर जिल्ह्यात रक्ताचा तुटवडा वाढला असल्याने सकल मराठा परिवार आणि सकल मराठा विद्यार्थी परिषद यांनी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.







राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत लातूरच्या सकल मराठा परिवार शाखेच्या वतीने येत्या १६ नोव्हेंबर २०२५ वार रविवार या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर येथे सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरामध्ये रक्तदात्यांना योग्य सुविधा आणि सम्मान दिला जाईल. रक्तदान केल्याने कोणताही दुष्परिणाम होत नाही आणि ३ महिन्यांनी पुन्हा रक्तदान करता येते.

सकल मराठा परिवार आणि सकल मराठा विद्यार्थी परिषद यांच्या वतीने या भव्य रक्तदान शिबिरामध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन आपली सामाजिक जबाबदारी पार पाडावी असे आवाहन करण्यात आले आहे. रक्तदान करू इच्छिणाऱ्या रक्तदात्यांनी राहुल जाधव - ७५०७६२६७६२ यांच्याकडे नाव नोंदणी करावी अशी विनंती सकल मराठा परिवाराने केली आहे.

# डिजेवर मोठ्या आवाजात गाणे वाजविणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल.

लातूर :- लातूर शहर परिसरात मोठ्या आवाजात डिजे वाजवून सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई ही सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियम व अटींचे उल्लंघन करीत मोठ्या आवाजात ध्वनीवर्धक यंत्रणेचा (डिजे) वापर करणाऱ्यांविरुद्ध करण्यात आली आहे.

दिनांक १२/११/२०२५ रोजी रात्री सुमारे २३:१० वाजता पोलीस ठाणे एमआयडीसी, लातूर येथील पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे व त्यांचा पथक हा हद्दीतील रात्रगस्त पेट्रोलिंगवर असताना, भक्ती शक्ती मंगल कार्यालय, रिंगरोड, खाडगाव रोड, लातूर समोर रोडच्या कडेला दोन बेस व दोन टॉप स्पीकर (डिजे साउंड सिस्टम) एका टेबलावर ठेवून मोठमोठ्या आवाजात गाणे वाजवित असल्याचे निदर्शनास आले. संबंधित डिजे सिस्टमचा मालक अनिकेत इंगळे याने हे उपकरण भक्ती शक्ती मंगल कार्यालयाचे मालक धनराज साठे यांच्या सांगण्यावरून हळदीच्या कार्यक्रमाच्या नावाखाली लावले. सदर कृतीतून सार्वजनिक शांततेचा भंग झाला असून, हे कृत्य मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनीप्रदूषण संदर्भातील आदेशांचे उल्लंघन करणारे आहे. त्यामुळे डिजे मालक अनिकेत इंगळे व




मंगल कार्यालयाचे मालक धनराज साठे या दोघांविरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी, लातूर येथे सार्वजनिक शांततेचा भंग व सर्वोच्च न्यायालय आदेशाचे उल्लंघन याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर कारवाई ही श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे, पोलीस हवालदार सचिन गिरी, पोलीस नाईक माधव अंबेकर, पोलीस अंमलदार राम जाधव, प्रविण दुधभाते, व विश्वांभर तुरे यांनी संयुक्तपणे केली. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस नाईक ज्ञानेश्वर काळगे करीत आहेत.

नागरिकांना आवाहन :
लातूर पोलीस विभागाकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे. विहित वेळेनंतर अथवा विना परवाना कोणत्याही प्रकारे डिजे, साउंड सिस्टीम, वाद्य, स्पीकर इत्यादींचा मोठ्या आवाजात वापर करू नये. असे आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात पंडित जवाहरलाल नेहरू जयंती अर्थात बालदिन संपन्न

केज/प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक १४ नोव्हेंबर २० २५ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू जयंती अर्थात बालदिन बालग्रंथ प्रदर्शन, बाल ग्रंथवाचन, व्याख्यान, बाल मेळावा आदी सांस्कृतिक कार्यक्रम घेवून साजरा करण्यात आला. सर्वप्रथम पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून बालगोपालांच्या हस्ते पुजन व वंदन करण्यात आले. सर्वप्रथम बालवाचकांसाठी सकाळी ८ ते दुपारी ५ या वेळात आयोजित केलेल्या बालग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. सकाळी ९ ते १० या वेळात बाल वाचकांनी ग्रंथवाचन केले. ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. वसुदेव( बप्पा )गायकवाड हे वाचक सभासदाकडून एक रुपाचीही फीस न घेता, स्वतः सर्व वाचकांची वार्षीक वर्गणी भरून वाचक मोफत सेवा देतात. याचा जास्तीत जास्त वाचकांनी कायदा घ्यावा असे आवाहन या बालमेळाव्यात सौ. जयश्री सिताराम वैरागे यांनी केले. यावेळी शिवकन्या गायकवाड, निलावती पोळ, संजय सोणवणे, रविंद्र गायकवाड, आनंद( भैय्या) गायकवाड यांनीही मार्गदर्शन केले. बालग्रंथवाचन, बालग्रंथ प्रदर्शन व बाल मेळावा कार्यक्रमात कु. महेशरी महेश गायकवाड, समिक्षा सतेश गायकवाड, शिवानी सतेश गायकवाड, स्वरा निलेश गायकवाड दिग्विजय रामेश्वर गायकवाड, श्रीपदा संतोष गायकवाड,वेदिका भारत घोगले,



त्यानंतर बालमेळावा घेण्यात आला. या बालमेळाव्यात अंगणवाडी कार्यकर्ती सौ. जयश्री सिताराम वैरागे, मदतनीस सौ. शिवकन्या गायकवाड संजय सोनवणे, आनंद गायकवाड, रविंद्र गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मार्गदर्शन करताना अंगनवाडी कार्यकर्ती सौ. जयश्री वैरागे यांनी बालक - बालिका यांना वाचनाचे वेड लागावे अशी भावना व्यक करून स्वानंद सार्वजनिक वाचनालयात बालसाहित्याचा खजिना असून बालवाचकांनी नियमित वाचन करावे असे आवाहन केले. तसेच स्वानंद सार्वजनिक वाचनालय नियमितपणे बालवाचक, वाचकांना प्रोत्साहन देत आहे तसेच मोफत वाचन सेवा देत आहे, यामुळे बालवाचक, विद्यार्थी, युवक, जेष्ठ नागरिक, महिला म्हणजेच गांवातील सर्व घटकांसाठी, लहाणांपासून - मोठ्यापर्यंत सर्वांनाच मोफत सेवा देत आहे, हि गांवाच्या सर्वाशीण विकासाला चालना देणारी बाब असल्याचे प्रतिपादन केले. प्रत्येक घटकातील वाचकांचा बौद्धीक, मानसीक विकास व्हावा ज्यामुळे शारीरीक, आर्थिक, सांस्कृतिक विकास होईल यासाठी १९९७ पासून धनश्री बालाजी गायकवाड, श्रेया दत्तत्रय गायकवाड, गुरुप्रसाद अमोल गायकवाड, जानवी दिपक पुरी, शिवमल्हार कृष्णा गायकवाड, यांनी ग्रंथप्रदर्शन, बाल ग्रंथवाचन, बालमेळावा,आदी सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतला. त्यानंतर ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांचे छोटेखानी व्याख्यान झाले. त्यांनी बालकांचे चाचा नेहरू यावर प्रकाश टाकला. तसेच बालवाचकांना बालपणा पासून वाचनाची सवय लागावी म्हणून वाचाल तर वाचाल असे सांगून काहीही वाचा पण वाचा हे वाचनाची नियमीत सवय लागण्या साठी आणि आयुष्याला दिशा देण्यासाठी आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते व परखड व्याख्याते, प्राचार्य, डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड हे होते. डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी थोडक्यात अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदशन बाजासाहेब गायकवाड यांनी केले.

# भोंदुगिरी ओळखण्याचे प्रशिक्षण आता एका क्लिक वर.! - डॉ नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठ सुरु होणार

पुणे : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मार्फत सुरु करण्यात येणाऱ्या डॉ नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठाचे लोकार्पण प्रसिद्ध सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते आणि राज्य शास्त्राचे जेष्ठ अभ्यासक सुहास पळशीकर यांच्या उपस्थिती मध्ये पुणे येथील पत्रकार भवन येथे रविवार १६ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे अशी माहिती महाराष्ट्र अंनिस मार्फत मिलिंद देशमुख श्रीपाल ललवाणी,राहुल थोरात आणि हमीद दाभोलकर यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या द्वारे दिली आहे.

या विद्यापीठातील अभ्यासक्रमांच्या मुळे वैज्ञानिक दृष्टिकोनाचे प्रशिक्षण घेतलेल्या नागरिकांना भोंदूबाबा बुवा ओळखणे आणि स्वत:ची फसवणूक थांबवणे सहज शक्य होणार आहे असे देखील या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. या विषयी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे कि,अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते सप्रयोग व्याख्यानातून सातत्याने विद्यार्थी व इतर नागरिकांसोबत अंधश्रद्धा निर्मूलनाशी संबंधित वेगवेगळ्या विषयांवर संवाद साधत असतात. मुलांना प्रत्यक्ष भेटून संवाद साधणे हे सर्वात प्रभावी असते परंतु त्याला मर्यादा असतात त्यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोचण्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठ या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलनाशी संबंधित वेगवेगळ्या विषयांवर छोटे ऑनलाइन कोर्से स अंनिस उपलब्ध करून देत आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा महत्वाचा भाग म्हणून सहभाग असताना असताना देखील प्रत्यक्षात शैक्षणिक अभ्यास क्रमात अनेक अवैज्ञानिक गोष्टी घुसडल्या जात आहेत. डार्विन च्या सिद्धांता सारख्या गोष्टी अभ्यासक्रमांतून वगळण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर वैज्ञानिक दृष्टीकोन प्रचार प्रसार होणारे अभ्यासक्रम हे नागरिकांना सहज उपलब्ध असावेत या साठी हे अभ्यासक्रम तयार करण्यात आल्याचे या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

पुढच्या दुसऱ्या टप्प्यात फलज्योतिष फोलपणा , मानसिक आरोग्य अशा स्वरूपाचे कोर्स देखील सुरु केले जाणार आहेत

सुरुवातीला या प्लॅटफॉर्मवर पुढील सहा कोर्सेस उपलब्ध असतील.

१.वैज्ञानिक दृष्टिकोन
२. अंगात येणे
३. भुताने झपाटणे
४. भ्रामक वास्तुशास्त्र
५. छद्म विज्ञान
६. व्यसनमुक्ती

तेरा वर्षांवरील मुलांपासून पुढे कोणताही नागरिक हे कोर्सेस करू शकेल. ऑनलाइन परीक्षा दिल्यानंतर प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांच्या सहीचे एक आकर्षक प्रमाणपत्र मिळेल. परीक्षेतील प्रश्न देखील केवळ माहिती नाही तर आकलन तपासणारे आहेत.

www.anisvidya.org.in वेबसाईटवर जाऊन आपली नोंदणी करून अभ्यासक्रम पूर्ण करायचा आहे. सर्व अभ्यासक्रम आणि परीक्षा नि:शुल्क आहेत अशी माहिती देखील या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

# नांदेड शहर व ग्रामीण जिल्हा समन्वयक पदी प्रदेश सरचिटणीस अँड व्यकटराव बेंद्रे यांची निवड

लातूर :- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. खा. श्री. सुनीलजी तटकरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमार्फत आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या दृष्टीने जिल्हा समन्वयकांची जिल्हावार नियुक्ती करण्यात आली आहे. त्यात नांदेड शहर व ग्रामीण जिल्हा समन्वयक पदी प्रदेश सरचिटणीस अँड व्यकटराव भगवानराव बेंद्रे यांची निवड करण्यात आली आहे



सदर नियुक्त्यांद्वारे पक्षाच्या संघटनात्मक व नियोजनात्मक विषयांबाबत नवी दिशा व बळकटी प्राप्त होईल, असा दृढ विश्वास सहकार मंत्री ना बाबासाहेब पाटील , माजी मंत्री आ संजय बनसोडे, आ विक्रम काळे, मकरंद सावे, अफसर शेख, प्रा अंकुश नाडे, प्रशांत पाटील आदीनी व्यक्त केला आहे.

# मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती साजरी

केज/प्रतिनिधी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती साजरी. मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले व जयंती साजरी करण्यात आली.मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ रोजी मक्का येथे झाला.भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक प्रमुख नेते आणि पहिले शिक्षणमंत्री होते.अबुल कलाम गुलाम मुहियुद्दीन अहमद असे त्यांचे मुळ नाव होते.हा दिवस' राष्ट्रीय शिक्षण दिन' म्हणून साजरा केला जातो.अबुल कलाम म्हणजे वाचस्पती ही त्यांची पदवी



होती.आझाद हे टोपणनावही त्यांना उपाधी मिळाली. असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आबासाहेब तुळशिराम धपाटे यांनी केले.या शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ.रामकिशन मुळे सर यांनी सविस्तर माहिती दिली.शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी डॉ.मुळे रामकिशन, श्री संदीप ठोंबरे, श्री राहुल बचुटे, श्री.आबासाहेब धपाटे, श्रीमती भोरे निलावती आनंदराव मॅडम, श्रीमती उटीकर अंजली गोविंद मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी काळे,शापोआ कामगार सुवर्णमाला नानासाहेब पवार, विद्यार्थी,विद्यार्थिंनी उपस्थित होते.शेवटी राहुल बजरंग बचुटे सर यांनी आभार मानले.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.